Vol 4 Issue 7 Jan 2015 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary
Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

*International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

*Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# *महाराष्ट्रातील प्रादेशिक राजकीय पक्षांच्या यशाची कारणमीमांसा*

*अशोक उपासे*

प्रमुख, राज्यषास्त्र विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

***सांराश*** :महाराष्ट्राच्या राजकारणात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भारतीय साम्यवादी पक्ष, मार्क्सवादी साम्यवादी पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सर्वगट), शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जनसुराज्य पक्ष, बहुजन समाज पक्ष, स्वतंत्र भारत पक्ष यासारख्या अनेक राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांनी कमी-अधिक प्रमाणात आपला प्रभाव निर्माण केलेला दिसून येतो.

### *प्रस्तावना :*

महाराष्ट्राच्या राजकारणात१९६० ते १९९५ पर्यंतच्या प्रदीर्घ कालखंडात (१९७८ ते १९८० हा कालावधी वगळून) कॉंग्रेस पक्षाचेचे वर्चस्व राहिलेले दिसून येते. परंतु १९९० पासून कॉंग्रेसचे हे वर्चस्व, प्रभुत्व कमी होत जाऊन १९९५ साली तर या पक्षाच्या हातून सत्ताच गेली. हे, असे का घडले? याची कारणमीमांसा केली तर, आपल्या लक्षात येईल की, हा कालावधीच (१९७८ ते १९९५) महाराष्ट्राच्या राजकारणात प्रादेशिक पक्षांना सक्रिय होऊन यशस्वी होण्याची संधी देतो. म्हणून प्रथम यासंदर्भाने कॉंग्रेसच्या एकपक्ष प्रभुत्त्वाचा ऱ्हास का झाला? याचा शोध घेणे यादृष्टीने आवश्यक ठरते.

### *1)कॉंग्रेसच्या एकपक्ष प्रभुत्त्व पध्दतीचा ऱ्हास :*

१९७८ ते १९९५ हा कालखंड महाराष्ट्राच्या राजकारणावर वर्चस्व गाजविणाऱ्या कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव आणि सामर्थ्य कमी करणारा कालावधी आहे. १९९५ साली तर कॉंग्रेसच्या हातून सत्ताच गेली. या बाबतची आणि प्रादेशिक पक्षांना राजकारणात आक्रमक बनण्याची संधी का मिळाली या संबंधीची कारणेः

#### *अ)कॉंग्रेस पक्ष श्रेष्ठींचे धोरण :*

१९६२ ते १९७२ या काळात महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्त्व काही मतभेद सोडले तर निर्विवाद होते. पक्षांतर्गत मतभेद असूनही पक्ष एकसंघ होता. कारण मराठा-मराठेत्तरवाद हया काळापर्यंत तरी निर्माण झालेला नव्हता. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत श्रीमती गांधींचे नेतृत्त्व राष्ट्रीय स्तरावर सर्वमान्य झाल्यानंतर, त्यांनी राज्यपातळीवरील सामर्थ्यवान नेत्यांच्या शक्तीचे खच्चीकरण करण्याचे धोरण स्वीकारले. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण खऱ्या अर्थाने बहुजन समाजाचे सर्वमान्य नेते असताना, ते मराठा समाजाचे नेते आहेत असा अपप्रचार करुन, मराठेत्तर समाज त्यांच्या विरोधात उभा करण्याची राजकीय खेळी खेळण्यात आली. त्यातूनच मराठा-मराठेत्तरवाद वाढत गेला आणि १९७८ साली पक्ष दुभंगला. तेव्हा मराठेत्तर गटाने यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्त्व झुगारुन दिले. अशा प्रकारच्या वादाचा परिणाम म्हणजे कॉंग्रेस हा केवळ मराठयांचा पक्ष आहे आणि मराठेत्तर समाजावर तो अन्याय करतो आहे. अशी समजूत झाल्यामुळे काही समाजघटक कॉंग्रेसपासून दूर गेले. १९७५ मध्ये पक्षांतील वरिष्ठांच्या दबावामुळे बराच काळ सत्तेवर असलेले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना राजीनामा द्यावा लागला आणि त्या जागी पक्ष श्रेष्ठीनी आपल्या इच्छेनुसारमहाराष्ट्रावर मुख्यमंत्री नेमण्याचा आणि बदलण्याचा एक अव्यवहार्य खेळ सुरु केला. जनमानसात स्थान नसलेल्या व्यक्ती सत्तेवर आल्या, मंत्रिमंडळाची रचना हायकमांडच्या आदेशानुसार करण्याची प्रथा सुरु होऊन, त्यातून

शह-कटाशहाचे राजकारण सुरुझाले. १९७८ मध्ये हायकमांडचा वचक असावा म्हणून नासिकराव तिरपुडे या बिगर मराठा जातीच्या नेत्याची उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. या सर्व घडामोडींचा परिणाम म्हणून पक्षश्रेष्ठी विरुध्दचा असंतोष पुढील थोडयाच काळात उफाळून वर आला आणि शरद पवारांच्या नेतृत्वाखाली १९७८ सालीच समाजवादी कॉंग्रेस पक्ष उदयास आला.

कॉंग्रेसच्या दिल्लीतील दरबारी राजकारणाने महाराष्ट्रात राज्यव्यापी नेतृत्व मोठे होऊ दिले नाही. १९८० ते ९४ या पंधरा वर्षात चार मुख्यमंत्री झाले. पण नेतृत्व स्थिर होऊ न देण्याची पूर्वीचीच खेळी दिल्लीतून खेळली गेली. गांधी-नेहरु कुटुंबियांशी असलेली निष्ठा हीच मुख्यमंत्री व मंत्री बनण्याची साधने झाली. या निष्ठेतून मंत्री झालेल्यानी महामंडळे आणि एसईओ सारख्या नियुक्त्याही केल्या नाहीत. मुस्लिम, दलित, आदिवासी या कॉंग्रेसच्या व्होटबँका आज त्यांच्या पासून निसटत आहेत. हा मतदार कायम राखण्यासाठी काही विशेष प्रयत्न होत आहेत अशी स्थिती नाही.

### ब)तिव्र स्वरुपाची गटबाजी :

महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये १९७८ पूर्वी गटबाजीचे राजकारण नव्हते असे नाही; ते होतेच. पण ते पक्षाच्या अस्तित्वाला धक्का लागेल एवढे तीव्र नव्हते. पुढे पक्षश्रेष्ठींच्या आशिर्वादाने हेच राजकारण पुढे वाढत गेले आणि शेवटी १९९५ साली खरे तर कॉंग्रेसनेच कॉंग्रेस पक्षाचा पराभव केला. राज्यस्तरावरील गटबाजीच्या राजकारणाची लागण जिल्हा,तालुका आणि गावपातळीवरही झाली. कॉंग्रेसजनच कॉंग्रेसपक्षाचे विरोधक बनले. त्यामुळे पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात असंतुष्ट बंडखोरी करु लागले आणि या बरोबरच अधिकृत उमेदवाराचा पराभव करण्यासाठी कॉंग्रेसेत्तर पक्षांची मदत घेऊ लागले. आणि वेळप्रसंगी त्यांना मदत करु लागले.

गटबाजीच्या राजकारणामुळे कॉंगेसपक्षकमकुवत होत गेला असला तरी १९९० पर्यंत प्रभावी पक्ष नसल्यामुळे कॉंग्रेसला सत्ता मिळत गेली. महत्त्व प्राप्त होत गेले. १९९० च्या विधानसभा निवडणुकीने धोक्याचा ईशारा दिला होताच, परंतु गटबाजीच्या राजकारणात गुरफटलेल्या नेत्यांनी त्यागोष्टींकडे दुर्लक्ष केले. आणि शेवटी १९९५ साली कॉंग्रेस पक्षाला सत्ता सोडावी लागली. या निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीला यशस्वी करण्यासाठी अपक्षांचा फोजफाटा कॉंग्रेसच्या बंडखोर नेत्यांनींच पुरविला म्हणजेच कॉंग्रेस अंतर्गत असलेल्या तीव्र स्वरुपाच्या गटबाजीने एकीकडे कॉंग्रेसचा पराभव तर केलाच, पण दुसरीकडे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रादेशिक व जातियवादी शिवसेना-भाजप या पक्षांना सत्ता, शक्ती व सामर्थ्य मिळवून देवून, हे दोन्ही पक्ष (युती) या प्रकारे यशस्वी होऊ शकतात हे ही दाखवून दिले.

महाराष्ट्रात कॉंग्रेसच्या राजकारणाची सत्तासुत्रे सतत मराठा नेतृत्त्वाकडे राहिल्यामुळे, मराठयांचे हे वर्चस्व संपुष्टात आणण्यासाठी मराठेत्तर समाज एकसंघ बनत गेला. त्यांच्या अशा प्रयत्नास पक्षश्रेष्ठींनीच खत-पाणी घातले. त्यामुळे मराठे-मराठेत्तर अशा वादाची परीणिती पक्षातील गटबाजी अधिक तीव्र होण्यास झाली. यामध्ये पक्षाला पाठिंबा देणारे मराठेत्तर समाज घटक कॉंग्रेस पासून दूर गेले आणि दुसऱ्या बाजूने शिवसेना-भाजप युती ही कॉंग्रेसला पर्यांय ठरत असतांना मराठेत्तर समाज त्या शक्तीकडे वळला. त्यात आणखी भर म्हणजे असंतुष्ट मराठा नेते देखील आपल्या राजकीय ईच्छापुर्तीसाठी शिवसेना-भाजपकडे वळला. आपला सामाजिक पाया विस्तृत करण्यासाठी शिवसेना-भाजपने विखे, हिरे, मोहिते -पाटील, नाईक निंबाळकर इत्यादी घराण्यांना आपल्याकडे येण्यास प्रवृत केले. म्हणजेच मराठा जातीचे धुरीणत्त्व मराठेत्तर जातींना मान्य नाही आणि विशिष्ट मराठयांचे नेतृत्त्व इतर मराठयांना मान्य नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून कॉंग्रेसचा सामाजिक पाया संकुचित होत जाऊन महाराष्ट्राच्या राजकारणातील त्यांचे महत्व कमी झाले.

### क)सामाजिक पायांचे अकुंचनः

१९९० ते ७२ पर्यंतमहाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाला व्यापक सामाजिक जनाधार होता. बेरजेच्या राजकारणामुळे तो सामाजिक जनाधार वाढत जाऊन पक्ष जनमानसात मोठया प्रमाणात विस्तारला. ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर मतभेदाच्या पार्श्वभूमिवर हा पक्ष बहुजन समाजाच्या आकांक्षांचे प्रतिनिधीत्व करीत होता. अनुसुचित जाती-जमाती आणि अल्पसंख्यांक गटांचा देखील त्यास पाठिंबा होता. पक्षाचा सामाजिक पाया विस्तृत असल्याने पक्षातील गटबाजीचा पक्षाच्या निवडणुकीतील कामगिरीवर विशेष परिणाम होत नसे. पण १९७२ नंतर मराठा-मराठेत्तर वादामुळे विदर्भातील काही मागास जाती व इतर मागास जाती कॉंग्रेसपासून दूरावल्या. मराठवाडा विद्यापाठाच्या नामांतरासाठी दलीतातील काही गट कॉंग्रेसपासून दूरावले होत, तर विद्यापीठाच्या नामांतरानंतर मराठवाडयातील मराठ समाज दुखावला गेला. मंडल आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीवरुन काही इतर मागासवर्गीय जाती दुरावल्या. तर शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या निर्णयामुळे मराठा समाज, मराठा महासंघ कॉंग्रेसच्या विरोधात गेला. १९९२-९३ च्या दंगलीनंतर मुस्लिम समाज दुरावला आणि पक्षापासून दूर गेला. अशा प्रकारे कॉंग्रेसचा सामाजिक पाया वरचेवर संकुचित होत गेला. आणि शेवटी तो पक्ष सत्ताभ्रष्ट झाला. तेव्हा ही पोकळी भरुन काढण्यासाठी प्रादेशिक, जातीय व हितसंबंधी पक्षांना व गटांना संधी मिळाली. परिणामी त्यांना यशाचा मार्ग दिसू लागताच ते आक्रमक झाले.

*ड)संघटनात्मक विस्कळीतपणाः*

१९९० साली संपूर्ण महाराष्ट्रभर संघटना असलेला कॉंग्रेस हा एकच पक्षहोता. संघटनात्मक पाया व्यापक व बळकट करण्यासाठी पंचायत राज्यव्यवस्था, सहकारी संस्थामध्ये ग्रामीण भागातील नेत्यांना व कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली. पण पुढे पंचायत राज्यव्यवस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने ही सर्व ग्रामीण भागातील सत्ताकेंद्रे बनली आणि त्यावर आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी स्थानिक नेतृत्त्वात स्पर्धा सुरु झाली. त्यातून स्थानिक पातळीवर पक्ष कमकुवत बनत गेला. पक्षश्रेष्टींनी पक्षाच्या संघटनेकडे दुर्लक्ष केले. परिणामी कालांतराने संपूर्ण पक्ष संघटनाच निष्क्रिय झाली. अशा परिस्थितीत जे चित्र निर्माण झाले. ते म्हणजे नेते आहेत, राजकीय पक्ष आहेत. परंतु पक्ष संघटनाच अस्तित्वात नाही. यामुळे कॉंग्रेस पक्ष कमकुवत, दुबळा बनला आणि पुढे सत्ताभ्रष्ट झाला.

*ई)आत्मकेंद्रीत राजकारणः*

पक्षश्रेष्ठी, सर्व स्तरावरील नेते व कार्यकर्ते पक्षहिताला प्राधान्य न देता स्वतःच्या हितसंबंधाला प्रथम स्थान देऊन जे आत्मकेंद्री राजकारण करु लागले, त्यामुळे कॉंग्रेस पक्षाचा ऱ्हास झाला.

*फ)पक्ष आणि पक्ष नेत्यांची डागाळलेली प्रतिमा :*

सतत सत्तेवर राहिल्याने भ्रष्टाचारी राजकारण्यांचा पक्ष अशी कॉंग्रेस पक्षाची प्रतिमा जनमाणसात निर्माण झाली. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनांनी, विरोधी पक्षातील नेत्यांनी आणि कॉंग्रेस मधीलच विरोधकांनी कॉंग्रेस आणि तिचे नेते यांची प्रतिमा जनमाणसात डागाळण्याच्या दृष्टीने प्रचार मोहिमच उघडली. यामुळे पक्षाची एकूण प्रतिमाच भ्रष्टाचारी, अकार्यक्षम अशी झाली. तेव्हा अशा या कॉंग्रेस पक्षाला धडा शिकविण्यासाठी महाराष्ट्रातील जनतेला तयार करण्याचे कार्य विरोधकांनी व विरोधी पक्षांनी केले आणि त्यातून ते महाराष्ट्रात सत्ताधारी बनण्यात यशस्वी झाले.

*2) कॉंग्रेसला समर्थ पर्याय निर्माण झाला :*

१९९० साली महाराष्ट्राच्या राजकारणात विधायक बदल झाला. शिवसेना-भाजप युतीच्या रुपाने महाराष्ट्रातील मतदारांना कॉंग्रेसला पर्याय ठरु शकेल अशी राजकीय शक्ती मिळाली. १९८४-९० च्या काळात नामांतर विरोध व मंडल विरोधी आंदोलनाच्या निमित्ताने आणि हिदुत्त्ववादी विचारसरणीच्या प्रसाराद्वारे शिवसेना-भारतीय जनता पक्ष महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात झपाटयाने पसरला. हिंदुत्त्वाचा विचार शहरी आणि निमशहरी भागातील मतदारांच्या पसंतीला उतरला. परिणामी शिवसेना-भाजप युतीस राज्यात अनुकूल वातावरण तयार झाले. याची प्रचिती १९९० च्या विधानसभा निवडणुकीतच आली होती. या निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे शिवसेना-भाजप युतीने अधिक आक्रमक भूमिका घेतली. याप्रमाणे कॉंग्रेसला भक्कम असा विरोधी पर्याय निर्माण होत असताना, कॉंग्रेस नेते निष्क्रिय राहिले. ते गटबाजीच्या राजकारणात गुंतले. त्यातून त्यांचे पक्ष हिताकडे दुर्लक्ष झाले. या सर्वांचा एकूण परिणाम असा झाला की १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा पराभव होऊन शिवसेना-भाजप युती सत्तेवर आली. ही राजकीय परिस्थिती असे स्पष्ट करते की, प्रादेशिक, जातीय, धार्मिक, वर्गीय हितसंबंधावर आधारित राजकीय पक्ष प्रादेशिक स्तरावर यशस्वी होऊ शकतात.

*3)प्रादेशिक पक्षांचे वाढते महत्त्व :*

व्यापक राष्ट्रीय हितावर राजकीय पक्षांची उभारणी करुन राष्ट्र, राज्य व जनकल्याणाची कामे करण्याचे दिवस आता इतिहास जमा झालेल दिसतात. उलट विशिष्ट संकुचित ध्येयधोरण, प्रादेशिक अस्मिता, भूमिपुत्रांचे प्रश्न, भाषा, जात यावर आधारित राजकीय पक्षांची निर्मिती करुन राजकारणात आपला प्रभाव पाडणे, सत्ता मिळविणे यासाठीचे प्रयत्न जोरात सुरु असलेले दिसून येतात. एवढेच नव्हे तर अशा राजकीय पक्षांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून ते आपल्या उद्दिष्टांप्रती यशस्वी होताना दिसत आहेत. शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लिकन पक्ष, शिवसेना इत्यादी पक्षांचे प्रादेशिक महत्त्व वाढत आहे. खरे तर महाराष्ट्रात प्रादेशिक पक्षांच्या राजकारणाची सुरुवात शिवसेनेच्या निर्मिती पासूनचझालेली दिसून येते. त्यात नंतरच्या काळात महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जनसुराज्य पक्ष, स्वाभिमानी पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष, शिवसंग्राम पक्ष यासारखे प्रादेशिक व स्थानिक पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणावर आपल्या स्वार्थी व संकुचित उद्दिष्टांप्रती प्राप्तीसाठी प्रभाव टाकण्यात यशस्वी होताना दिसत आहेत. स्थानिक व प्रादेशिक पक्षांच्या या वाढत्या प्रभावाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कारण यातून पुढे स्थानिक व प्रादेशिक अहंकार निर्माण झाला, तर तो राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता व लोकशाही व्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो.

***4)व्यक्तिनिष्ठा व विभूतिपुजेवर आधारित राजकीय पक्ष :***

महाराष्ट्र राज्यापुरता विचार केला तर, येथील राजकीय पक्षावर विशिष्ट व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या प्रतिमांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर कॉंग्रेसला महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाचा भक्कम आधार मिळाल्यामुळेच महाराष्ट्राच्या राजकारणात, व शासन व्यवस्थेत तो पक्ष यशस्वी होऊ शकला. बाळासाहेब ठाकरे यांच्या करिश्म्यातूनच शिवसेनेची निर्मिती होऊन तो पक्ष सत्ताधारी बनला, व आजही तो पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणावर आपला प्रभाव टिकवून आहे. शरद पवारांचे व्यक्तिमत्व, त्यांचा राजकारणातील व्यासंगी अनुभव आणि इच्छाशक्ती या आधारावरच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष उदयास आला. आणि महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरील काही राज्यात आपल्या कार्याद्वारे प्रभावीझाल्याचे दिसून येते. राज ठाकरे यांना त्यांच्या वलयांकित व्यक्तिमत्वामुळेच शिवसेनेतून बाहेर पडून महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष स्थापन करता आला. आणि त्या आधारावरच तो पक्ष राज्याच्या राजकारणात सक्रिय असल्याचे दिसून येते. रिपब्लिकन पक्षावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव पडलेला आहेच. पण अलिकडील काळात या पक्षांतून जे अनेक गट निर्माण झाले, त्यास रामदास आठवले; खोब्रागडे, प्रकाश आंबेडकर, जोगेंद्र कवाडे, गवळी, तसेच राजूशेट्टी यांचा स्वाभिमानी पक्ष या सर्वच पक्षांच्या कार्यावर, विचारसरणी आणि यशापयशावर वरील व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते.

***5)जाती–धर्मावर आधारित राजकीय पक्षः***

महाराष्ट्रात जाती-धर्माच्या आधारावर राजकारण करुन हितसंबंध साधनारे, सत्ताप्राप्त करणारे राजकीय पक्ष सक्रिय आहेत. म्हणूनच येथील राजकारणावर जात, धर्म व भाषा यांचा बराच मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. हिंदू महासभा, मुस्लिम लींग यासारखे पक्ष सांप्रदायिकतेवर आधारलेले आहेत. भाजप सारखा पक्ष शेटजी-भटजींचा पक्ष म्हणून ओळखला जात असे. मराठा, लिंगायत, जैन या जातींचाहीं राजकारणावर, राजकीय पक्षावर प्रभाव पडलेला दिसून येतो. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा लॉबीचा प्रभाव आजही दिसून येतो. अशा परिस्थितीत सर्वच राजकीय पक्ष अशा जातवार मतदारांचा पाठिंबा मिळवून राजकारणातील व शासनातील आपला सहभाग यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील असलेले दिसून येतात.

***6) सीमाप्रश्न, विकासातील असमतोल, धर्मनिरपेक्ष संकल्पनाः*** इत्यादींचा आधार घेऊन काही प्रादेशिक व राष्ट्रीय पक्ष देखील महाराष्ट्राच्या राजकारणात यशस्वी होताना दिसतात.

***संदर्भ ग्रंथ :***

१) सिरशीकर व. म. -आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-२००१.
२) पळशीकर सुहास- जात व महाराष्ट्रातील राजकारण, सुगावा प्रकाशन, पुणे-२००३ दु.आ.
३) जैन अशोक- महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, सेठ पब्लिकेशन, मुंबई-१९९८.
४) दिवान मोहन-भारतातील राज्यांचे राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर-डिसेंबर२००४.
५) साप्ताहिक सकाळ - १४ जून २०१४.
६) साप्ताहिक साधना - १२जुलै २०१४.
७) महाराष्ट्र टाईम्स - रविवार, १४ सप्टेंबर २०१४
८) महाराष्ट्र टाईम्स - रविवार, २१ सप्टेंबर २०१४
९) लोकसत्ता- रविवार, २४ ऑगस्ट २०१४
१०)लोकसत्ता- रविवार, १४ सप्टेंबर २०१४
११) संचार (इंद्रधनू) - रविवार, २४ ऑगस्ट २०१४
१२) संचार (इंद्रधनू) - रविवार, २१ सप्टेंबर २०१४
१३)पुण्य नगरी- रविवार, २१ सप्टेंबर २०१४
१४) दैनिक सकाळ- रविवार, २५ मार्च २०१४ व २२ सप्टेंबर २०१४



***अशोक उपासे***
प्रमुख, राज्यषास्त्र विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org